# दहावी नंतरचा कौशल्य आणि तंत्रज्ञान मिळवून देणारा डिप्लोमा अभ्यासक्रम

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे मंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील, राज्यमंत्री मा. श्री. इंद्रनील नाईक, उच्च तंत्र शिक्षण विभागाचे सचिव श्री. वेणु गोपाल रेड्डी, डॉ. विनोद मोहितकर संचालक महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. प्रमोद नाईक संचालक महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई तसेच MSBTE चे मार्गदर्शक डॉ. भरतदादा अमळकर या मान्यवरांनी डिप्लोमा संस्थांचा विकास व्हावा व महाराष्ट्र राज्यात तंत्रशिक्षणाचा प्रसार व्हावा या दृष्टिकोनातून खालील महत्त्वपूर्ण निर्णय घेतले:

- विद्यार्थीनींकरिता मोफत शिक्षण
- फेसलिफ्टिंगद्वारे इमारतींची दुरुस्ती
- प्रयोगशाळेत आवश्यक उपकरणांची सुविधा
- विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान देण्यासाठी उभारलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स सारख्या IOT, ROBOTICS तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक प्रयोगशाळा
- CET सेलतर्फे उभारलेल्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळा
- MSBTE तर्फे उभारलेल्या संगणक प्रयोगशाळा
- अत्याधुनिक उपकरणे असलेल्या व्यायामशाळा
- मैदानातील खुल्या व्यायामशाळा
- स्कूल कनेक्ट उपक्रमाद्वारे तंत्रशिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

वरील बाबींचे फलित म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा महाराष्ट्राच्या सर्व विभागांमधून प्रथम क्रमांक आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे दहावीनंतरच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला डिप्लोमा अभ्यासक्रम खालील कारणांमुळे सामान्य विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या पसंतीस येत आहे.

- वयाच्या १८ ते १९ व्या वर्षापर्यंत शिक्षण पूर्ण करून स्वतः च्या पायावर उभे राहण्याचे कौशल्य देणारा अभ्यासक्रम
- पदवीच्या तुलनेत कमी कालावधीचे शिक्षण (तीन वर्ष कालावधी)
- CET प्रवेश परीक्षा न देता प्रवेश मिळू शकणारा अभ्यासक्रम
- कमीत कमी खर्चात तंत्रशिक्षण
- जलद वेतनक्षम करिअर सुरु करण्याची संधी असलेले शिक्षण

डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांना बांधकाम व्यवसाय, पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जा निर्मिती, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन, ऑटोमोबाइल, मेकॅनिकल या औद्योगिक क्षेत्रात, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सॉफ्टवेअर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲन्ड मशीन लर्निंग, डेटा सायन्सेस, ई. क्षेत्रात सरकारी अथवा खाजगी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच हे विद्यार्थी विविध क्षेत्रात स्वतः चे स्टार्टअप व्यवसाय सुद्धा सुरु करीत आहेत.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे राबवण्यात येणारा डिप्लोमा अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP 2020) 'K' स्कीम अंतर्गत थेट उद्योगाच्या गरजांशी संबंधित कौशल्ये आणि ज्ञान देण्यावर आधारित आहे व विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात प्रॅक्टिकल अनुभव आणि इंटर्नशिप मिळवण्याची संधी दिली जाते.

**'K' स्कीम' ची ठळक वैशिष्ट्ये:**

- कौशल्य विकास (Skill Development),
- रोजगारास अधिक मदत (Enhancing Employability),
- इंडस्ट्रीच्या गरजांशी संरेखण (Industry Alignment),

- आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगतता (Global Standardization),
- प्रॅक्टिकल आणि इंटर्नशिप संधी (Practical and Internship Opportunities),
- द्रुत शिक्षण प्रक्रिया (Accelerated Learning Process),
- विविधता आणि समावेशकता (Diversity and Inclusion).

- **डिप्लोमासाठी प्रवेशाची पात्रता** - किमान ३५% गुणांनी १० वी (SSC) उत्तीर्ण असलेला कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी डिप्लोमाच्या प्रवेशासाठी पात्र आहे

- **डिप्लोमा अभ्यासक्रमास अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** –

  - १० वी मार्कशीट (10th Marksheet)
  - शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate)
  - जातचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
  - नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र (Non- Creamy Layer Certificate) (If applicable)
  - वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असल्यास उत्पन्नाचा दाखला (Income certificate)
  - राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र (Nationality certificate)
  - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र (Economically Weaker Section Certificate) **(FOR OPEN CATEGORY ONLY)**
  - दिव्यांगाबाबतचे प्रमाणपत्र (Person with Disability) (If applicable)
  - सैन्य दलासाठी संवर्ग (Defence certificate) (If applicable)
  - पासपोर्ट साईज फोटो (Passport size Photo)
- **डिप्लोमा अभ्यासक्रमास भरावयाची कॉलेज फी**–

शासकीय डिप्लोमा कॉलेजेससाठी OPEN कॅटेगिरीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांचे उत्पन्न ८ लाखाच्या वर असल्यास शैक्षणिक शुल्क रुपये ६००० व इतर फी भरावी लागते. OBC, EBC, EWS कॅटेगिरीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांचे उत्पन्न ८ लाखाच्या आत असल्यास शैक्षणिक शुल्क रुपये ३००० व इतर फी भरावी लागते. तसेच TFWS, SC, ST, DT, VJ, NT, SBC कॅटेगिरीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांचे उत्पन्न ८ लाखाच्या आत असल्यास शैक्षणिक शुल्क भरावे लागत नाही केवळ इतर फी भरावी लागते. इतर फी सुमारे ३००० ते ४००० रुपये असते.

खाजगी डिप्लोमा कॉलेजेससाठीची फी FEES FIXATION COMMITTEE यांच्याकडून ठरवून दिली जाते. MSBTE च्या अधिकृत https://msbteffc.in/index_main.php या वेबसाईटवर विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील खाजगी डिप्लोमा कॉलेजेसची समितीने ठरवून दिलेली फी बघता येते. विद्यार्थ्यांना ज्या खाजगी डिप्लोमा कॉलेजेला प्रवेश घेण्याची इच्छा आहे त्या कॉलेजेची एकूण फी वरील वेबसाईटवर बघितल्यानंतर संबंधित कॉलेजकडून खात्री करून घ्यावी व मगच आपल्या परिस्थितीनुसार सदर संस्थेत प्रवेश घेणे शक्य असल्यास त्या संस्थेचा ऑप्शन टाकावा

**डिप्लोमामध्ये प्रवेश घेण्यासाठी खालीलप्रमाणे प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करावी लागते:**

- **ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अर्ज**- महाराष्ट्र राज्यात एकूण ३८७ डिप्लोमा कॉलेजेसमध्ये ११५२७७ जागा आहेत व जळगाव जिल्ह्यात एकूण १८ डिप्लोमा कॉलेजेसमध्ये ४७१६ जागा आहेत. डिप्लोमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (DTE) यांच्यातर्फे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येते. DTE च्या अधिकृत **https://poly25users.dtemaharashtra.gov.in/diploma25/** वेबसाइटवर **ADMISSIONS** या Tab अंतर्गत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील एकूण ३८७ डिप्लोमा कॉलेजेससाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत **एकच अर्ज** ऑनलाइन पद्धतीने करावा. सदर अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे

स्कॅन करून अपलोड करावी. विद्यार्थ्यांनी **<u>पालकांसोबतच</u>** दिवसभरात केव्हाही सदर प्रक्रिया मोबाईलवर किंवा कॉम्प्युटरचा उपयोग करून ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करावी. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी लांबच लांब रांगांमध्ये उभे राहण्याची आवश्यकता नाही यासाठी विद्यार्थ्यांनी **<u>E Scrutiny</u>** हे ऑप्शन निवडावे जेणेकरून त्यांना ऑनलाइन पद्धतीनेच कागदपत्रांच्या त्रुटी कळविण्यात येतात व त्याची पूर्तताही ऑनलाइन पद्धतीनेच करता येते. सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना **<u>RECEIPT CUM ACKNOWLEDGEMENT</u>** ही अर्ज जमा झाल्याची पोच पावती ऑनलाइन पद्धतीनेच मिळते जेणेकरून विद्यार्थ्यांना अर्ज जमा झाल्याची खात्री होते

- **मेरिट लिस्ट** – DTE विद्यार्थ्यांच्या दहावीच्या निकालावर आधारीत मेरिट लिस्ट तयार करते. या मेरिट लिस्ट द्वारे विद्यार्थी महाराष्ट्राच्या यादीत आपण कितव्या क्रमांकावर आहे हे तपासू शकतो. याचा फायदा पुढील प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना ऑप्शन फॉर्म भरताना होत असतो

- **पहिली फेरी –**

➢ **विकल्प निश्चिती (Option form)**- विद्यार्थ्याला एकूण 300 पर्याय म्हणजेच ऑप्शन दिलेले असतात याद्वारे विद्यार्थी आपल्या आवडीची महाविद्यालये व ब्रॅंचेस निवडून त्यांना क्रमवारीने लावतो व ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया ओटीपी टाकून पूर्ण करतो

➢ **जागा वाटप (Seat Allotment)** - प्रवेशाची सीट अलॉटमेंट प्रक्रिया ऑनलाइन केली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांनुसार आणि प्राधान्यानुसार कॉलेज अलॉटमेंट करण्यात येते.

➢ **प्रवेश निश्चिती (Seat Confirmation)**- ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे महाविद्यालय व ब्रॅंच मिळालेली असेल असे विद्यार्थी त्या महाविद्यालयात जाऊन फी भरून व आवश्यक कागदपत्र जमा करून आपला प्रवेश निश्चित करतात

- **दुसरी फेरी-** ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीमध्ये आवडीचे महाविद्यालय किंवा ब्रॅंच मिळालेली नसेल त्यांना ऑप्शन फॉर्म भरण्यापासूनची वरिल प्रक्रिया पुन्हा करून दुसरी फेरी वरीलप्रमाणे खेळता येते

- **तिसरी फेरी-** ज्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीमध्येही आवडीचे महाविद्यालय किंवा ब्रॅंच मिळालेली नसेल त्यांना ऑप्शन फॉर्म भरण्यापासूनची वरिल प्रक्रिया पुन्हा करून तिसरी फेरी वरीलप्रमाणे खेळता येते

- **चौथी फेरी-** ज्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीमध्येही आवडीचे महाविद्यालय किंवा ब्रॅंच मिळालेली नसेल त्यांना ऑप्शन फॉर्म भरण्यापासूनची वरिल प्रक्रिया पुन्हा करून चौथी फेरी वरीलप्रमाणे खेळता येते

- **समुपदेशन फेरी-** ज्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या फेरीमध्येही आवडीचे महाविद्यालय किंवा ब्रॅंच मिळालेली नसेल अशा विद्यार्थ्यांनी ज्या संस्थेत त्यांना प्रवेश घ्यावयाचा असेल त्या संस्थेत प्रत्यक्ष समुपदेशन फेरीच्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहून सदर फेरी ही त्या संस्थेतच पूर्ण करावी.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे मार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी व आवश्यक साहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी व त्या जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये सुविधा केंद्रे (Facilitation Centre) उपलब्ध करून दिलेली आहेत. या संधीचा विद्यार्थ्यांनी व पालकांनी लाभ घ्यावा व प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याअगोदर संपूर्ण माहिती घेण्यासाठी या सुविधा केंद्रांना भेट द्यावी. सदर सुविधा केंद्रांची यादी DTE च्या वेबसाइटवर https://poly25users.dtemaharashtra.gov.in/diploma25/ प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

डॉ. पराग मधुकर पाटील
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन जळगाव